# मिरा भाईंदर महानगरपालिका

(३६)

पशुसंवर्धन विभाग
जा.क्र.मनपा/प.स./८६/२०२३-२४
दि. :०८/०६/२०२३.

## -: जाहीर सुचना :-

**संदर्भ :- मा. आयुक्त महोदय यांची दि.०८/०६/२०२३ ची मान्यता.**

**( महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 331 अन्वये व महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन कायदा 1976 कलम 7 अन्वये )**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील तमाम नागरीकांना कळविण्यात येते की, बकरी ईद सणा (कुर्बानी) निमित्त दिनांक 29/06/2023ते 01/07/2023 या कालावधीत नियमानुसार पशुधन विकास अधिकारी यांच्याकडून कत्तल करण्यास पात्र असलेली जनावरे **नजाकत शराफत कुरेशी, रा. उत्तन मोठागाव, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे.** या ठिकाणी कत्तल / कुर्बानी करण्यास प्रतिवर्षी प्रमाणे परवानगी देण्यात येत आहे. सदर नमुद केलेल्या जागेशिवाय इतर कोणत्याही ठिकाणी जनावरांची कत्तल करू नये. इतर ठिकाणी कत्तल केल्यास महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या 1949 ये कलम 334 अन्वये कारवाई करण्यात येते.

सदर नमुद केलेल्या ठिकाणी जनावरे कत्तल केल्यानंतर त्याचे मांस व इतर पदार्थ वाहुन नेण्याची जवाबदारी कुर्बानी करणाऱ्या जनावरांच्या मालकाची तसेच संबंधीत जागा मालकाची राहील.

कुर्बानीची जनावरे कत्तल करण्यापुर्वी महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन कायद्या अन्वये जनावरे कत्तलीस योग्य आहेत किंवा नाहीत याचा दाखला शासनाचे पशुधन विकास अधिकारी यांचेकडुन परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच नमुद केलेल्या जागेच्या भोवताली राहणाऱ्या नागरीकांना त्रास होईल असे कोणतेही कृत्य करण्यास परवानगी नाही.

मिरा भाईंदर महापालिका सुरक्षीततेच्या अन्य कारणास्तव शासनाने प्रतिबंधात्मक आदेश/निर्देश प्राप्त झाल्यास शासनाच्या आदेशानुसार संभाव्य बदल करण्याचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे.

(रवि पवार)
**उप आयुक्त (पशुसंवर्धन)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका,**

**(टिप : बकरी ईदची तारीख निश्चित झाल्यास तो दिवस व पुढील 2 दिवस कत्तलीस (कुर्बानीस) मान्यता देण्यात येईल).**

**प्रत माहितीसाठी :-**

1) **मा. आयुक्त महोदय**
2) **मा. अतिरिक्त आयुक्त**
3) **वरिष्ठ पोलिस निरिक्षक,(सर्व)**
4) **मा. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग**
5) **मा. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग**
   **मिरा भाईंदर महानगरपालिका**

Scanned with OKEN Scanner